नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/04/2023 (शुक्रवार) दुपार

## पार्सल नावाखाली फसवणुक करणाऱ्या दोन आरोपींना अटक

फिर्यादी यांनी ऑनलॉईन पार्सल ऑर्डर केला व त्याबाबत स्टेटस जाणुन घ्यायचे असल्याने गुगलवर नंबर सर्च केला असता फिर्यादीस त्या संबंधाने लगेच कॉल आला. **“मी एयरवेज कुरीअर इंडीया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी मधुन बोलत आहे”** तुम्ही ऑर्डर केलेले पार्सल नागपूर मध्ये आलेले आहे. ते तुम्हाला सायंकाळ पर्यत डिलीव्हर होवुन जाईल. त्या करीता तुम्हाला रजिस्ट्रेशन करीता ५ रूपये भरावे लागेल. परंतु फिर्यादीने मोबाईलवर कळविले की, मला लगेच पार्सल पाहिजे मी माणुस पाठवितो व रजिस्ट्रेशन फि पेड करतो परंतु फोन वरील व्यक्तीने ऑनलाईन प्रोसेस आहे. तुम्लाला ऑनलाईनच प्रोसेस करावी लागेल त्यावर फिर्यादी तयार झाले. सदर नंबर वरून लिंक पाठविली असता त्यावर ०५ रू टाकले. वाट पाहल्यानंतर पार्सल मिळाले नाही. नंतर फोन केले असता गाडी निघुन गेली असे कारण सांगीतले.

दुसऱ्या दिवशी फिर्यादीच्या मोबाईलवर बॅके कडुन पैसे १,११,०००/— डेबिट झाल्याचे मॅसेज फिर्यादीस प्राप्त झाले. फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे ५१८/२०२२ कलम ४२० भा.द.वी.सह ६६ (डी) आय.टी.ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हा तांत्रीक स्वरूपाचा असल्याने सायबर पो.स्टे. कडुन तांत्रीक तपास करून आरोपीची माहिती घेवुन मा. पोलीस अधिक्षक यांचे आदेशान्वये टीम तयार करून झारखंड येथे रवाना करण्यात आले. सदर टिमला तांत्रीक मार्गदर्शन करून दोन आरोपीना पो.स्टे खापरखेडा येथे अटक करण्यात यश प्राप्त झाले.

सदर कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद, मा. अपर पोलीस अधिक्षकश्री डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात सायबर पोस्टेचे सहायक पोलीस निरीक्षक श्री आशिषसिंग ठाकूर, पोलीस उप निरीक्षक श्री निशांत जुनोनकर तसेच श्री देवेंद्र सोनावले पोस्टे कोंढाळी पोना रवी मेश्राम, पोशि संदिप वाघमारे, संदीप सावरकर सायबर पोस्टे येथील पोहवा स्नेहलता ढवळे, पोना वर्षा खंडाईत, संगीता गावंडे, संतीश राठोड पोशि मृणाल राऊत यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर